**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १२ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर महानगरपालिकेतर्फे मनपाच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'महर्षी सुदर्शन बाल्मिकी वसाहत' आणि प्रधानमंत्री आवास योजना २.०' अंतर्गत ईडब्ल्यूएस सदनिका 'स्वप्नपूर्ती' प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन.**
2. **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेची ६ महिन्यांची विशेष माफी योजना सुरू.**
3. **पुण्यातील मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृतांचा आकडा ९ वर.**
4. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत महारेलद्वारे राज्यातील चार आरओबी 'चार भुयारी मार्ग, एका आर यु बी चे लोकार्पण.**

**आता सविस्तर बातम्या .......**

स्वप्नपूर्ती' प्रकल्प

नागपूर महानगरपालिकेतर्फे मनपाच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी उत्तर नागपूरातील मौजा-नारी इथे उभारण्यात येणाऱ्या 'महर्षी सुदर्शन बाल्मिकी वसाहत' आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल ईडब्ल्यूएस गटातील 'प्रधानमंत्री आवास योजना २.०' अंतर्गत ईडब्ल्यूएस सदनिका 'स्वप्नपूर्ती' प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे होत्या. कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व पात्र सफाई कर्मचाऱ्यांना श्रमसाफल्य योजनेअंतर्गत 300 चौरस फुटांचे मोफत घर उपलब्ध करून देण्याचा शासनाचा निर्णय कायम ठेवण्यात आल्याचे नमुद केलं. मनपाद्वारे उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पाला "महर्षी सुदर्शन बाल्मीकी वसाहत" असे नाव देण्यात येणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितले.

या वसाहतीत उद्यान, सामुदायिक सभागृह, सौरऊर्जा प्रणाली, सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था, पाणीपुरवठा व इतर आधुनिक नागरी सुविधा उपलब्ध करून आदर्श वसाहत उभारण्यात येणार असल्याच मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितल. महर्षी सुदर्शन बाल्मिकी वसाहतीत सफाई कर्मचाऱ्यांसाठी एकूण १४ इमारतींमध्ये दोन बीएचकेच्या तब्बल ३९२ सदनिका उभारण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेच्या स्वप्नपूर्ती गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी परवडणाऱ्या किमतीत एक आणि दोन बीचएकेच्या एकूण ५१८ सदनिका उभारल्या जाणार आहेत. तीन वर्षात हे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

विशेष माफी योजना

ईपीएफओ म्हणजेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं ६ महिन्यांची विशेष माफी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत, प्राप्तीकर कायद्यांतर्गत मान्यताप्राप्त भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट चालवणाऱ्या आस्थापनांना आपलं पीएफ ट्रस्ट ईपीएफओकडे नियमित करण्याची संधी देण्यात आली आहे. ज्या कंपन्यांनी स्वतःचा पीएफ ट्रस्ट बनवला आहे, मात्र त्यांच्याकडे सरकारची अधिकृत मंजुरी नाही, त्यांना नियमित होण्याची ही संधी एकदाच मिळणार आहे. ही योजना सहा महिन्यांसाठी खुली असेल आणि पात्र आस्थापनांना आपला अर्ज ई-मेलद्वारे संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठवावा लागेल.

पंतप्रधान मायदेशी

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला तीन देशांचा दौरा आटोपून काल नवी दिल्लीत परतले. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी इंडोनेशियाला भेट दिली आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. तर दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधानानी ऑस्ट्रेलियाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला तसंच भारत-ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम दरम्यान दोन्ही देशांच्या प्रमुख उद्योजकांना संबोधित केलं. या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यातली त्यांची न्यूझीलंड भेट ऐतिहासिक ठरली. चार दशकांहून अधिक काळानंतर भारतीय पंतप्रधानानी न्यूझीलंडचा केलेला हा दौरा द्विपक्षीय संबंधांना मोठी चालना देणारा ठरला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्याशी चर्चा केली.

संरक्षण, पर्यटन, क्रीडा, आपत्ती व्यवस्थापन तसंच दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन या पाच क्षेत्रांमध्ये यावेळी १० सामंजस्य करार करण्यात आले.

मोशी कचरा डेपो दुर्घटना

पुणे जिल्ह्यतल्या मोशी कचरा डेपो दुर्घटना प्रकरणातल्या मृतांची संख्या ९ वर पोहोचली आहे. बचाव कार्यादरम्यान, काल या ठिकाणी आणखी ७ जणांचे मृतदेह सापडले. पुणे जिल्ह्यात मोशी इथं ८ जुलै रोजी एका इमारतीवर कचऱ्याचा ढिगारा कोसळून झालेल्या या दुर्घटनेत २३ जण अडकले होते. त्यापैकी ५ जण सुरक्षितपणे बाहेर आले. तर ९ जणांची सुटका करण्यात आली. दुर्घटनेच्या ठिकाणी अद्याप बचाव कार्य सुरु असून, बेपत्ता झालेल्यांचा शोध सुरु असल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं.

उड्डाणपूल

राज्यातील नागरिकांना सुरक्षित कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित दळणवळण सुविधा उपलब्ध करुन देतांनाच रेल्वे फाटका अभावी होणारे अपघात टाळण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उडाण पुलाच्या बांधमांना प्राधान्य देण्यात येत असून, रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे केली. वर्धमाननगर येथे रेल्वे क्रॉसिंगवर चार पदरी रोड, ओवर ब्रिज तसेच राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या ९ महत्वपूर्ण पायाभूत सुविधांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉपोरेशन लिमिटेड [महारेल] यांनी विकसित केलेल्या या प्रकल्पाचे लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी होते. अध्यक्षीय भाषणात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यानी शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच पारडी येथील उडाण पुलाच्या सोबतच येथील व्यावसायीकांसाठी आधुनिक भाजी मार्केट तसेच स्पोर्ट क्लब बांधण्यात येणार असून, या प्रकल्पाच्या १५० कोटी रुपयाच्या खर्चापैकी ४० कोटी रुपयाचा निधी एनएचआयतर्फे देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

बनावट बियाणे

अकोल्यात आज बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्या २ कंपन्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे दावे करणाऱ्या या कंपन्यांपैकी एक

जालना जिल्ह्यातली तर दुसरी मध्यप्रदेशातली आहे. संबंधित कंपन्यांच्या बियाण्यांच्या क्षमतेबाबत शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पॅकेटवर केलेला दावा बियाणे नियमांची दिशाभूल करणारा असल्याचं तपासणीत स्पष्ट झालं आहे, अशी माहिती जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी दिली.

आंदोलन

गेल्या दहा दिवसांपासून कामबंद आंदोलनावर असलेल्या भंडारा जिल्ह्यातील तुमसर नगरपरिषदेतल्या ६० कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांनी प्रशासनाविरोधात शुक्रवारपासून अधिक तीव्र आंदोलन पुकारलं आहे. गेल्या दोन महिन्यांपासून रखडलेलं वेतन, किमान वेतनाचा लाभ न मिळणं आणि सुरक्षेसाठी आवश्यक मूलभूत साहित्याचा पुरवठा न होणं, या मागण्यांसाठी कामगारांनी मुख्याधिकाऱ्यांच्या गाडीला घेराव घातला. यानंतर ठोस आश्वासन न मिळाल्यानं, न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवायचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला आहे.

फिफा

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांत इंग्लंड आणि अर्जेंटिनानं आपापले सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. इंग्लंडनं अतिरिक्त वेळेत गोल करत नॉर्वेवर २-१ असा विजय मिळवला. तर अर्जेंटिनानं स्वित्झर्लंडवर ३-१ अशी मात केली. स्पेन आणि फ्रान्सनं याआधीच उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं होतं. आता येत्या बुधवारी उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात फ्रान्स आणि स्पेन यांच्यात लढत होईल. दुसरा उपांत्य सामना गुरुवारी इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यात होणार आहे. दोन्ही सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता सुरु होतील. स्पर्धेचा अंतिम सामना २० जुलै रोजी न्यूयॉर्क न्यू जर्सी स्टेडियमवर होणार आहे. तर तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना १९ जुलैला होणार आहे.

क्रिकेट कसोटी

लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर इंग्लंड आणि भारत यांच्यात ऐतिहासिक एकमेव महिला कसोटी क्रिकेट सामना सुरू आहे. या सामन्याच्या तिसऱ्या दिवसाच्या खेळात अखेरच वृत्त हाती आले, तेव्हा भारताने आपल्या दुसऱ्या डावात ४ गडी बाद २५०

धावा केल्या होत्या. त्यामुळे भारताने ३६५ धावांची आघाडीघेतली आहे. यापूर्वी इंग्लंडचा पहिला डाव काल १७० धावांत आटोपला. एमी जोन्स हिने सर्वाधिक ५३ धावा केल्या. भारताकडून क्रांती गोड हिने पाच बळी घेत चमकदार कामगिरी केली, तर सयाली सातघरे आणि स्नेह राणा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

हवामान

हवामान ! राज्यात मान्सूनची गती मंदावल्यानं अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा कायम आहे. राज्यात येत्या काही दिवसांमध्ये पावसाचं प्रमाण तुलनेनं कमी राहील अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.  नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने 15 आणि 16 जुलै रोजी पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलक्या मध्यम पावसाचा यलो अलर्ट घोषित केला आहे. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यातील मानेगाव जवळ असलेल्या पूर्णा नदी पात्रात दोन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना आज घडली आहे. हे दोघेजण नदी पात्रात आंघोळीसाठी उतरले असताना त्यांना पाण्यातील खोलीचा अंदाज आला नाही आणि ते दोघेही खोल पाण्यात बुडाल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीने दिली आहे.

बोगस बियाणे

खरीप हंगामात बुलढाणा जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी बियाण्यांच्या सदोष उगवण क्षमतेमुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. जिल्ह्यात सुमारे ८ लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली असली, तरी अनेक भागांत बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे यानंतर शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रार केल्यानंतर. या गंभीर परिस्थितीची दखल कृषी विभागाने तातडीने पावले उचलली ८००हून अधिक बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत.चिखली तालुक्यात तब्बल ४२ हेक्टरवरील सोयाबीन अजिबात उगवले नसल्याचे समोर आले आहे. बोगस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कोणत्याही कंपनीची गय केली जाणार नाही. प्रयोगशाळेचा अहवाल येताच दोषी कंपन्यांवर कायद्यानुसार कठोर कायदेशीर फौजदारी कारवाई केली जाईल, असे कृषी विभागाच्या वतीने म्हटलं आहे आहे.